|| सा विद्या या विमुक्तये ||

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED**

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994-Recognized by the UGC U/s 2(f) and 12(b), NAAC Re-accredited with 'B++' Grade

CONVOCATION SECTION

Phone : (02462) 215294 website:srtmun.ac.in e-mail.:directorboee@gmail.com

जा क्र./दीक्षांत/२०२५–२६/1111 दिनांक : २९/०८/२०२५

:: २८ वा दीक्षान्त समारंभ सूचना ::

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
**मा.संचालक विद्यापीठ संकूले नांदेड परीसर,**
**मा.संचालक उपकेंद्र लातूर, उपपरिसर परभणी ,**
**मा.प्राचार्य न्यु मॉडेल डिग्री कॉलेज,हिंगोली.**
**कै. उत्तमराव राठोड अदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट.**
**प्रस्तुत विद्यापीठ.**

**विषय : २८ वा दीक्षान्त समारंभ सूचना.**

**महोदय,**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा २८ वा दीक्षान्त समारंभ शनिवार **दिनांक २० सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता** विद्यापीठाचे मा. कुलपती महोदय यांच्या अध्यक्षतेखाली तसेच **मा.कुलगुरु, प्र.कुलगुरु व सर्व प्राधिकरण सदस्य** यांच्या उपस्थितीत विद्यापीठ प्रांगणात घेण्याचे ठरले आहे.

सदरील दीक्षान्त समारभामध्ये **सुवर्ण** पदक **प्राप्त विद्यार्थी व पीएच.डी.पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनाच पदवीप्रमाणपत्र प्रमुख उपस्थितांच्या हस्ते वितरीत करण्यात येणार आहेत. त्यामुळे सुवर्ण पदक प्राप्त विद्यार्थ्यांनी दिनांक २० सप्टेंबर २०२५ च्या अगोदर प्रस्तुत विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील समन्वय कक्ष तळमजला येथे कक्षातील कर्मचारी श्री.प्रकाश चित्ते (९५४५६८१४६६) यांच्याकडे प्रत्यक्ष किंवा भ्रमणध्वनी वरुन नांव नोंदणी करणे आनिवार्य आहे. ज्यांची १९/०९/२०२५ पर्यंत नोंदणी झालेली आहे, त्याच विद्यार्थ्यांना कार्यक्रमाच्या दिवशी सुवर्ण पदक वितरीत करण्यात येईल. पीएच.डी.पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनी सकाळी ८.०० ते ०९.००** दरम्यान त्यांच्या उपस्थितीची नोंद पदव्युत्तर विभाग (P.G. Section) प्रस्तुत विद्यापीठ येथे

करणे अनिवार्य आहे. **पीएच.डी.पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना व सुवर्ण पदक प्राप्त विद्यार्थ्यांना दुपारच्या सत्रात ठिक २.०० वाजता त्याच दीक्षान्त मंचावर पदवी प्रमाणपत्र वितरीत केले जाणार आहेत याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.**

तसेच प्रस्तुत विद्यापीठातील सर्व संकुलातील विद्यार्थ्यांनी, विद्यापीठ उपकेंद्र लातूर संकुलातील विद्यार्थ्यांनी व न्यू मॉडल डीग्री कॉलेज हिंगोली येथील ज्या विद्यार्थ्यांनी २७ व्या दीक्षान्त समारंभासाठी उपस्थित राहुन पदवी/पदविका घेण्यासाठी अर्ज सादर केले आहेत, आशाच विद्यार्थ्यांना प्रस्तुत विद्यापीठातील दीक्षान्त कक्ष विभागातून सकाळी ८.०० ते १०.३० दरम्यान पदवीप्रमाणपत्र वितरीत केले जातील.

यावेळी दीक्षान्त मंडपात उपस्थित राहाण्यासाठी विद्यार्थ्यांना विद्याशाखानिहाय ठरविण्यात आलेले उपरणे लेखा विभागामधून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी अनामत रक्कम रु.१५०/– लेखा विभागामध्ये जमा करणे आवश्यक आहे. त्यांनतरच संबधितांना दीक्षान्त समारंभाच्या वेळेपूरते परीधान करण्यासाठी उपरणे दिले जातील. दीक्षान्त समारंभ संपल्यानंतर उपरण्यासाठी जमा केलेली अनामत रक्कम रु.१५०/– पैकी उपरणे शुल्कापोटी रु.१०/– वजा करुन उर्वरीत शुल्क रक्कंम रु.१४०/– परत करण्यात येईल. यासाठी **पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रासाठी भरलेल्या शुल्काची मुळ पावती व स्वतः चे ओळखपत्र (I. D. Proof) सोबत असणे/ ठेवणे अनिवार्य आहे.**

दीक्षात समारंभामध्ये उपस्थित राहून पदवी/पदवीका गृहण करणा–यां विद्यार्थ्यांनी पांढरा पायजमा/पॅट व पांढरा बुशशर्ट (कॉलरसहित) तसेच, विद्यार्थीनींनी पांढरी साडी व पांढरा ब्लाउज किंवा पांढ–या रंगाच्या ओढणीसह पांढरा पंजाबी ड्रेस परीधान केलेला असावा.

**प्रस्तुत विद्यापीठाशी सर्व संलग्नीत महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा विभागाच्या दिनांक १६.०६.२०२५ रोजीच्या परीपत्रकानुसार आप – आपल्या महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलले आहेत, अशा विद्यार्थ्यांचे पदवी प्रमाणपत्र दिनांक २० सप्टेंबर २०२५ च्या विद्यापीठातील दीक्षान्त समारंभाच्या नंतर त्यांच्या महाविद्यालयातच मिळणार आहेत. उपरोक्त सर्व संबधितांनी एक महिन्याचे आत महाविद्यालयस्तरावर पदवी वितरण कार्यक्रमाचे आयोजन करुन पदवी प्रमाणपत्र वितरीत करावेत.**

वरीलप्रमाणे २८ वा दीक्षान्त समारंभ हा आपल्या विद्यापीठाचा महत्वपुर्ण सोहळा असल्यामूळे त्यास सर्व संलग्नीत महाविद्यालयाचे प्राचार्य,शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती प्रार्थनीय आहे. **सदरील परीपत्रकाची नोंद घेवून उपरोक्त बाब सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणुन दयावी.**

(हुशारसिंग शंकरसिंग साबळे)

**प्र. संचालक,**

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

प्रत माहितीस्तव :

०१ मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. यांना देवून विनंती की, उपरोक्त पदवी प्रमाणपत्र वाटपा बाबतचा निर्णय विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावा.

०२. सर्व संकुलाचे संचालक, यांना देवून विनंती की, उपरोक्त पदवीप्रमाणपत्र वाटपा बाबतची सूचना विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

०३. सर्व विभाग प्रमुख, प्रशासकीय व शैक्षणिक विभाग/संकुल प्रस्तुत विद्यापीठ.